| MHRT100004362025 | | |
|---|---|---|
| | प्रकरण दाखल तारीख | ०१/०८/२०२५ |
| | प्रकरण नोंदल्याची तारीख | ०१/०८/२०२५ |
| | निकाल तारीख | १३/०७/२०२६ |
| | कालावधी | वर्षे महीने दिवस<br>०० ११ १२ |

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद (।))**

**राजापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी – श्रीमती एस. एस. हाके)**

| **नियमित फौजदारी खटला क्र.६२/२०२५** | **निशाणी क्रमांक – १८** |
|---|---|
| **खटला क्रमांक** | **नियमित फौजदारी खटला क्र.६२/२०२५** |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलीस ठाणे** | गु.र.क्र.१३८/२०२५, राजापूर पोलीस ठाणे, ता.राजापूर, जि.रत्नागिरी. |
| **अभियोगपक्ष** | महाराष्ट्र शासनतर्फे राजापूर पोलीस ठाणे, जि. रत्नागिरी.<br>**(मूळ फिर्यादीः गुन्हयाचे स्वरुप पाहता, फिर्यादी हिचे नाव गोपनिय ठेवण्यात आले आहे)** |
| **प्रतिनिधीत्व** | अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. बी. एस. सुपेकर. |
| ***विरुध्द*** | |
| **आरोपी** | **सचिन सिताराम गुरव,**<br>**वय** – ४५ वर्षे, **धंदा** – हॉटेल व्यवसाय,<br>**राहणार** – कोदवली, गुरववाडी,<br>ता. राजापूर, जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. बी. पाध्ये. |

**<u>भाग ब</u>**

**<u>(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ (॥))</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०१/०६/२०२५ ते २९/०७/२०२५ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ३०/०७/२०२५ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | ०१/०८/२०२५ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १६/०९/२०२५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १८/०३/२०२६ |
| निकालाची तारीख | १३/०७/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधीत नाही. |

| *आरोपी क्र.* | *आरोपीचे नाव* | *अटकेची तारीख* | *जामीनावर सोडलेची तारीख* | *दोषारोप ठेवलेले गुन्हे* | *निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली* | *दिलेली शिक्षा* | *फौ.प्र.सं.कलम ४२८ संपरिक्षेचे दरम्याने निरुध्द केलेल्या कालावधी* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन सिताराम गुरव | आरोपीस भा.न्या.सु.सं कलम ३५(३) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. | १६/०९/२०२५ | भारतीय न्याय संहिता कलम ७८(१)(२), ७९, ३५१(३) अन्वये. | आरोपीस निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | -- |

**<u>भाग क</u>**

**(<u>फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ (॥।)</u>)**

**<u>साक्षीदारांची यादी</u>**

**अ. सरकारी साक्षीदारांची यादी**

| साक्षीदार क्र. | नाव | (पुराव्याचे स्वरुप) साक्षीदाराची भुमीका | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १ | फिर्यादी | फिर्यादी | १२ |

**ब. बचावाचे साक्षीदार – निरंक**

**क. अभियोगपक्षाच्या / बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी**

**अभियोगपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी**

| *अनु.क्र.* | *कागदपत्रांचे वर्णन* | *निशाणी क्रमांक* |
|---|---|---|
| १ | फिर्याद | १३ |
| २ | पुरवणी जबाब | १४ |
| ३ | भारतीय न्याय संहिता कलम १८३ अन्वये, फिर्यादीचा नोंदविण्यात आलेला जबाब | १५ |

बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी - निरंक

**मुद्देमाल**

| मुद्देमाल वस्तु क्र. | वर्णन |
|---|---|
| १ | एक काळया रंगाची हिरो कंपनीची त्यावर स्प्लेंडर प्लस इंग्रजीमध्ये लिहिलेले असुन तिचा क्रमांक एमएच–०८–एए–८८४० असुन तिचा चेसिस क्रमांक MBLHA10ALCHE62540 असलेली मोटारसायकल. |
| २ | एक aqua blue रंगाचा Redmi A2 कंपनीचा ॲन्ड्रॉईड मोबाईल हॅन्डसेट असुन मॉडेल क्रमांक 23028RN4DI असा असुन त्याचा IMEI No. - 864782062981301 व 864782062981319 असा असलेला. |

**न्यायनिर्णय**

**(घोषणा दिनांक १३/०७/२०२६)**

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ (यापुढे ज्यास थोडक्यात 'न्याय संहिता' असे संबोधले आहे) चे कलम ७८(१) (२), ७९, ३५१(३) अन्वये, शिक्षापात्र अपराधासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

**<u>अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-</u>**

**०२)** दिनांक ०१/०६/२०२५ रोजी २२:५० वाजता ते दिनांक २९/०७/२०२५ रोजी ०७:३० वाजताचे दरम्याने मौजे वरचीपेठ, राजापुर, ता. राजापुर, जि. रत्नागिरी येथे फिर्यादी व आरोपी यांची पुर्वीची मैत्री असुन आरोपी – सचिन सिताराम गुरव हा फिर्यादीकडे फोन करुन सतत लग्नाची मागणी करीत होता. फिर्यादीने आरोपी – सचिन याला तुझे लग्न झालेले आहे, मला तुझ्यासोबत लग्न करायचे नाही, असे सांगुन देखील फिर्यादीला आरोपीने वारंवार फोन करुन दिनांक ०१/०६/२०२५ रोजी फिर्यादीच्या मोबाईलवर 'Bayko sodun geli Tu ye mala Tu pahije' असा मॅसेज करुन फिर्यादी हिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तसेच दिनांक २९/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०७:३० वाजता आरोपी – सचिन हा फिर्यादीच्या घराबाहेर येवुन जोरजोरात गाडीचा हॉर्न वाजवुन ती बाहेर गेली असता तिला हाताने बोलाविण्याचा इशारा केला. आरोपी – सचिन यास फिर्यादीने स्वत:चे लग्न ठरल्याचे सांगितले असता, आरोपीने फिर्यादीस *'तु लग्न केलेस तर मी तुला ठार मारेन',* अशी धमकी दिली. सबब, आरोपीविरुध्द राजापुर पोलीस ठाणे येथे फिर्याद भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७८(१) (२), ७९, ३५१(३) अन्वये दाखल केली.

**०३)** ठाणे अंमलदार राजापूर पोलीस ठाणे यांनी त्यानंतर आरोपीविरुध्द वर नमुद कलमाच्या अपराधाकरीता गुन्हा क्र.१३८/२०२५ नोंदविला व त्याचा तपास अधिकारी दिपज्योती पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, राजापूर पोलीस ठाणे यांच्याकडे दिला. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०४)** आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७८(१) (२), ७९, ३५१(३) अन्वये अपराधाकरीता आरोपीला दोषारोप वाचून समजावून सांगितले असता आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले. त्यानंतर याकामी अभिलेखावर पुरावा आल्यानंतर आरोपीचे कलम ३१३(१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार जबाब नोंदविण्याची आवश्यकता भासली नाही.

**०५)** अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास येतात त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०१/०६/२०२५ रोजी २२:५० वाजता ते दिनांक २९/०७/२०२५ रोजी ०७:३० वाजताचे दरम्याने मौजे वरचीपेठ, राजापुर, ता. राजापुर, जि. रत्नागिरी येथे फिर्यादीने आरोपीला 'तुझे लग्न झालेले असुन मला तुझ्यासोबत लग्न करायचे नाही', असे सांगुन देखील तिला वारंवार फोन करुन तिचा पाठलाग केला आणि अशाप्रकारे भा.न्या.सं.कलम ७८(१)(२) अन्वये, गुन्हा केला असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **...नाही.** |
| २. | वर नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या मोबाईलवर 'Bayko sodun geli Tu ye mala Tu pahije', असा मॅसेज करुन फिर्यादी हिचे मनास लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले तसेच फिर्यादी हिचे घराबाहेर येवुन जोरजोरात गाडीचा हॉर्न वाजवुन ती बाहेर गेली असता तिला हाताने बोलाविण्याचा इशारा केला आणि अशाप्रकारे भा.न्या.सं.कलम ७९ नुसार गुन्हा केला असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **...नाही.** |
| ३. | वर नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीला फिर्यादीने स्वत:चे लग्न ठरल्याचे सांगितले असता देखील आरोपीने फिर्यादीस 'तु लग्न केलेस तर मी तुला ठार मारेन', अशी धमकी दिली आणि | **...नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | अशाप्रकारे भा.न्या.सं.कलम ३५१(३) नुसार गुन्हा केला असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | |
| ४. | आरोपीने अपराध केल्याचे शाबीत झाले आहे काय ? | **...आरोपीस दोषमुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ करीता</u> –**

**०६)** प्रस्तुत खटल्यातील पुराव्याचा विचार करता मुद्दे क्र. ०१ ते ०३ हे एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे मुद्दे क्र. ०१ ते ०३ हे एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतले आहेत.

**०७)** आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार फिर्यादी (अ.सा.क्र.०१) यांची साक्ष निशाणी क्रमांक १२ येथे नोंदविण्यात आलेली आहे.

**०८)** प्रस्तुत केसकामी नोंदविणेत आलेल्या साक्षीदाराच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, आरोपीने फिर्यादीच्या मोबाईलवर मेसेज केल्यासंदर्भात फिर्यादीने पोलीस ठाण्यात निशाणी क्रमांक १३ कडील तक्रार दाखल केली होती. तसेच फिर्यादीने दिनांक ३१/०७/२०२५ रोजी पोलीसांकडे फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविलेला आहे. फिर्यादीच्या फिर्यादमधील घटनेची तारिख ०१/०६/२०२५ अशी असताना चुकुन सदर तारिख ०१/०७/२०२५ अशी नमुद करण्यात आली होती म्हणुन फिर्यादीने तिचा निशाणी क्रमांक १४ कडील पुरवणी जबाब नोंदिवला. उलटतपासा दरम्याने फिर्यादी साक्षीदाराने तथाकथीत घटनेच्या पुर्वीपासुन फिर्यादीची व आरोपीची ओळख असुन घटनेपुर्वी फिर्यादी व आरोपी एकमेकांशी फोन–मॅसेजद्वारे संपर्कात होते, हे मान्य केले आहे. फिर्यादीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर फिर्यादी व आरोपी दरम्यान त्यांचे कुटुंबियांच्या सांमजस्याने वाद मिटलेले आहेत, हे मान्य केले आहे. दोन्ही कुटूंबियांच्या चर्चेदरम्यान प्रस्तुतची फिर्याद फिर्यादीने गैरसमजुतीतुन दिल्याचे फिर्यादीच्या

लक्षात आले आहे, हे मान्य केले आहे. साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता सदर साक्षीदाराने फिर्यादी व आरोपीचे दरम्यान न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितलेले असून त्यांनी आरोपीविरुध्द गैरसमजुतीतून तक्रार दिली होती असल्याचे सांगितले.

०९) एकंदरीत प्रस्तुत केसकामी असलेला पुराव्याचे तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे एकत्रात अवलोकन केले असता, त्यामध्ये सुसंगता दिसून येत नाही. तसेच साक्षीदाराच्या साक्षी पुराव्यादरम्यान देखील आरोपीविरुध्द सबळ व संयुक्तिक पुरावा मिळून आला असे म्हणता येत नाही. त्यामुळे याकामी अभियोगपक्षाने आरोपीनेच सदर गुन्हयाचे कृत्य केले ही बाब सबळ व संयुक्तिक पुराव्यानिशी शाबीत केली असे म्हणता येणार नाही.

१०) वरील चर्चेनुसार दिसून आलेल्या परिस्थितीत, अभियोगपक्षाच्या साक्षीदाराची साक्ष ही आरोपीने अभियोगपक्षाचे कथनानुसार गुन्हयाचे कृत्य केले असल्याचा निष्कर्ष काढणेसाठी निःसंशय सबळ पुरावा ठरत नाही. आरोपी – सचिन सिताराम गुरव हा फिर्यादीकडे फोन करुन सतत लग्नाची मागणी करीत होता. फिर्यादीने आरोपी – सचिन याला तुझे लग्न झालेले आहे, मला तुझ्यासोबत लग्न करायचे नाही, असे सांगुन देखील फिर्यादीला आरोपीने वारंवार फोन करुन दिनांक ०१/०६/२०२५ रोजी फिर्यादीच्या मोबाईलवर 'Bayko sodun geli Tu ye mala Tu pahije' असा मॅसेज करुन फिर्यादी हिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तसेच दिनांक २९/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०७:३० वाजता आरोपी – सचिन हा फिर्यादीच्या घराबाहेर येवुन जोरजोरात गाडीचा हॉर्न वाजवुन ती बाहेर गेली असता तिला हाताने बोलाविण्याचा इशारा केला. आरोपी – सचिन यास फिर्यादीने स्वत:चे लग्न ठरल्याचे सांगितले असता, आरोपीने फिर्यादीस *'तु लग्न केलेस तर मी तुला ठार मारेन',* अशी धमकी दिली व त्याद्वारे आरोपीने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७८(१) (२), ७९, ३५१(३) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे, असे अभियोगपक्षाने निःसंशयपणे सिध्द केलेले नाही. सबब, वरील कारणास्तव आरोपीला भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७८(१) (२), ७९, ३५१(३) अन्वये गुन्हयातून दोषमुक्त करण्यात येते. त्यामुळे

मुद्दे क्र. ०१ ते ०३ चे निष्कर्ष मी नकारार्थी काढून मुद्दा क्र. ०४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी नामे – **सचिन सिताराम गुरव** यांची ***भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७८(१) (२), ७९, ३५१(३) अन्वये***, या गुन्हयातून ***भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये***, निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचा जामीन विसर्जीत करण्यात येत आहे. |
| ३. | दोषारोपपत्रातील जप्त मुद्देमाल अनुक्रमांक ०१ कडील – एक काळया रंगाची हिरो कंपनीची त्यावर स्प्लेंडर प्लस इंग्रजीमध्ये लिहिलेले असुन तिचा क्रमांक एमएच–०८–एए–८८४० असुन तिचा चेसिस क्रमांक MBLHA10ALCHE62540 असलेली मोटारसायकल ही मुळ मालकास अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे परत देण्यात यावी. |
| ४. | दोषारोपपत्रातील जप्त मुद्देमाल अनुक्रमांक ०२ कडील – एक aqua blue रंगाचा Redmi A2 कंपनीचा ॲन्ड्रॉईड मोबाईल हॅन्डसेट असुन मॉडेल क्रमांक 23028RN4DI असा असुन त्याचा IMEI No. - 864782062981301 व 864782062981319 असा असलेला मोबाईल मुळ मालकास अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे परत देण्यात यावा. |
| ५. | आरोपीचे कलम ४३७-अ फौजदारी प्रकिया संहितेनुसार रुक्कम रुपये १५,०००/- इतक्या रक्कमेचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र पूर्वीचे पुढे चालू ठेवण्यात यावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)

SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.07.13 14:55:53 +0530

**दिनांक - १३/०७/२०२६**
**स्थळ: राजापूर**

**(एस. एस. हाके)**
**न्यादंडाधिकारी प्रथम वर्ग, राजापूर,**
**जि. रत्नागिरी.**

-: **CERTIFICATE** :-

I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | The Court of Civil Judge Junior Division and Judicial Magistrate F.C., Rajapur. |
| Date of Decision | : | 13/07/2026 |
| Judgment signed by Presiding Officer on | : | 13/07/2026 |
| Judgment uploaded on | : | 13/07/2026 |